SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI'S
Reg.No. F2301/Gad./Mah.

# Gramgeeta Mahavidyalaya

**Arts, Commerce & Science** (Granted)
**Chimur,** Dist. Chandrapur (M.S.) - 442903
Email : gmcchimur@gmail.com | Web.: www.gmcchimur.org

Principal
**Dr. Amir A. Dhamani**
M.Sc.Ph.D.

**Ph.No.** (07170) 203870, 203879
**Mob.** 9422128453, 9834230982

**Ref.No.:** GMC/2007/2020 **Date :** 11/03/2020

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय : रासेयो वार्षिक अहवाल स्विकारण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, ग्रामगीता महाविद्यालय चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर येथील रासेयो विभागाचे सत्र २०१९—२० करीता वार्षिक अहवाल आपणाकडे पाठवित आहोत.

कृपया आपण ते स्विकाराल. हि विनंती.

दिनांक :

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

सहपत्रे:

१) रासेयो नियमीत व शिबीर अहवाल
२) आवश्यक फोटो
३) बातम्याची कात्रणे

13/03/2020
लिपीक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर
# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल
# सत्र : २०१९-२०

## ➢ सामान्य माहीती :

१) **महाविद्यालयाचे नाव :** ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर ( कला वाणिज्य व विज्ञान)

२) **संपुर्ण पत्ता :** मु.पो. चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर

३) **प्राचार्यांचे नाव :** डॉ. अमीर ए. धमानी
**दुरध्वनी क्र. :** ०७१७०—२०३८७९

४) **कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव :** प्रा. अरुण विनायक पिसे
**दुरध्वनी क्र. :** ८८८८०१५१६१

५) **रासेयो सल्लागार समिती**

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. अमीर ए. धमानी | प्राचार्य | अध्यक्ष |
| २) श्री. चिवंडे साहेब | वन परिक्षेत्र अधिकारी | सदस्य |
| ३) श्री. संजय नागपीडक | तहसिलदार | सदस्य |
| ४) श्री. एम. एस. पुरी | बि.डि.ओ. | सदस्य |
| ५) डॉ. भगत | आरोग्य अधिक्षक<br>ग्रा. रुग्णालय, चिमूर | सदस्य |
| ६) प्रा. सुमेध वावरे | शिक्षक प्रतिनीधी | सदस्य |
| ७) प्रा. कु. प्रज्ञा खोब्रागडे | महिला शि. प्रतिनीधी | सदस्य |
| ८) रोशन प्रभाकर रेवतकर | विद्यार्थी प्रतिनीधी | सदस्य |
| ९) कु. वैशाली गुलाब दडमल | विद्यार्थीनी प्रतिनीधी | सदस्य |
| १०) सौ. पल्लवी शेंडे | सरपंच मालेवाडा | सदस्य |
| ११) प्रा. अरुण वि. पिसे | कार्यक्रम अधिकारी | सचिव |
| १२) प्रा. बिजनकुमार शिल | सह. कार्यक्रम अधिकारी | सहसचिव |
| १३) डॉ. संदिप सातव | शारिरीक शिक्षण विभाग | सदस्य |

**सल्लागार समितीच्या बैठका :** १७/०८/२०१९ व २९/०२/२०२०

६) रासेयो पथकाची संख्या — ०२

विद्यार्थी संख्या — १००

७) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या

| अ.जाती | | अ.जमाती | | वि.भा.ज. | | इमाव | | विमाव | | खुले | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. |
| ४८ | ४१ | ८८ | ८१ | ११ | २४ | ६२ | ६४ | ०१ | ०३ | ०५ | ०४ | २१५ | २१७ |

८) रासेयो नोंदणी झालेली विद्यार्थी संख्या — १००

९) विद्यार्थ्यांकरीता आयोजीत प्रबोधन वर्ग

विद्यार्थी प्रबोधन वर्ग, चर्चासत्र, मार्गदर्शन

१०) रासेयो पथकाने दत्तक घेतलेले गाव : मालेवाडा लोकसंख्या : १७५०

११) नियमीत रासेयो कार्यक्रम

१) स्वच्छता कार्यक्रम —

महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करणे

२) शांतता पथकाची स्थापना —

महाविद्यालयामध्ये शांतता व सहजीवनाचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे म्हणून शांतता पथकाची स्थापना करण्यात आली.

३) सुरक्षा पथकाची स्थापना —

सहजिवन सुरक्षेच्या दृष्टीने २० विद्यार्थ्यांचे सुरक्षा पथक स्थापण करण्यात आले.

४) पर्यावरण संवर्धन —

चिमूर तालुका: पर्यावरण समितीमध्ये एकुण ५० विद्यार्थ्यांची नोंद करण्यात आली.

५) व्यसनमुक्ती पथक —

विद्यार्थ्यांना व्यसनापासुन दुर करण्याच्या दृष्टीने एकुण २० विद्यार्थ्यांचे पथक स्थापन करण्यात आले.

६) रेड रिबन क्लब स्थापना —

विद्यार्थ्यांमध्ये एड्स जनजागृती घडवून आणण्यासाठी एकुण १५ विद्यार्थ्यांचे रेड रिबन क्लब स्थापन करण्यात आले.

➤ विविध नियमीत उपक्रम खालीलप्रमाणे :

१) क्रांतीदिन

दि. ०८ ऑगष्ट २०१९ रोजी क्रांतीदिन साजरा करण्यात आला. हुतात्म्यांना श्रद्धाजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अमीर धमानी व प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अरुण पिसे उपस्थित होते.

२) १४ ऑगष्ट २०१९

स्वातंत्र्य दिनानिमीत्त परिसर स्वच्छता

३) १५ ऑगष्ट २०१९

स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. मा. डॉ. अमीर धमानी यांनी ध्वजारोहन केले.

४) वृक्षारोपन कार्यक्रम

दि. १५ ऑगष्ट २०१९ रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षरोपण कार्यक्रम राजरा करण्यात आला. अनेक जातीची झाडे लावण्यात आली. एकुण ३५ झाडे लावली.

५) २३ ऑगष्ट २०१९

सातारा सांगली पुरग्रस्तांसाठी चिमूरमध्ये रॅलीचे आयोजन करुन पुरग्रस्तांना मदत निधी गोळा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी एकुण १९३६० रु. व इतर साहीत्य गोळा केले. नंतर हा निधी दि. ३०/०८/२०१९ रोजी विद्यापीठात पोहचविण्यात आला.

## ० सामाजीक समरसता पंधरवाडा ०

महाविद्यालयात सामाजीक समरसता पंधरवाडा निमीत्ताने विद्यार्थ्यांसाठी अनेक स्पर्धा आयोजीत करण्यात आल्यात.

**दि. २८/०८/२०१९ :** महाविद्यालयात पोस्टर स्पर्धा आयोजीत करण्यात आली. स्पर्धेसाठी पर्यावरण, महात्मा गांधी, बेटी बचाव इत्यादी विषय ठेवण्यात आलेत. या स्पर्धेत एकुण १० विद्यार्थी सहभागी झालेत.

परिक्षणाअंती

प्रथम क्रमांक — अकीब आरीफ शेख — बि.एस.सी. भाग ३

द्वितीय क्रमांक — कु. खुशबू मेश्राम — बि.ए. भाग २

यांना देण्यात आलेत.

**दि. २८/०८/२०१९** : रोजी रांगोळी स्पर्धा आयोजीत करण्यात आली. पर्यावरण, बेटी बचाव व महात्मा गांधी विषय ठेवण्यात आला. स्पर्धेत एकूण ११ विद्यार्थी सहभागी झालेत,

परिक्षणाअंती

प्रथम क्रमांक — कु. काजल सुनिल शेंडे — बि.एस.सी. भाग ३

द्वितीय क्रमांक — कु. खुशबू श्रीभगवान मेश्राम — बि.ए. भाग १

यांना देण्यात आलेत.

**दि. २८/०८/२०१९** : रोजी टाकावू पासुन टिकाऊ स्पर्धा आयोजीत करण्यात आली. स्पर्धेत एकुण ०५ विद्यार्थी सहभागी झालेत.

परिक्षणाअंती

प्रथम क्रमांक — कु. राखी धनराज कुबडे — बि.एस.सी. भाग १

द्वितीय क्रमांक — कु. अश्विनी एस. सावसाकडे — बि.ए. भाग १

यांना देण्यात आलेत.

**दि. २९/०८/२०१९** : रोजी कार्टुन पेटींग स्पर्धा आयोजीत करण्यात आली. स्पर्धेत एकुण १२ विद्यार्थी सहभागी झालेत..

परिक्षणाअंती

प्रथम क्रमांक — कु. प्राची गुरुदास मोटघरे — बि.एस.सी. भाग २

द्वितीय क्रमांक — कु. कोमल बालचन्ने — बि.एस.सी भाग १

यांना देण्यात आलेत.

**दि. ०३/०९/२०१९** : रोजी 'जम्मु काश्मीर मधील ३७० कलम हटविणे योग्य की अयोग्य' या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजीत करण्यात आली. स्पर्धेत एकुण १५ विद्यार्थी सहभागी झालेत.

परिक्षणाअंती

प्रथम क्रमांक — अकीब आरीफ शेख — बि.एस.सी. भाग ३

द्वितीय क्रमांक — प्रविण पोडीशेट्टी — बि.ए. भाग २

यांना देण्यात आलेत.

**दि. ०४/०९/२०१९** : रोजी वर्तृत्व स्पर्धा आयोजीत करण्यात आली. स्पर्धेत एकुण १३ विद्यार्थी सहभागी झालेत.

परिक्षणाअंती

प्रथम क्रमांक — अकीब आरीफ शेख — बि.एस.सी. भाग ३

द्वितीय क्रमांक — स्वरुप पुरुषोत्तम बडगे — बि.ए. भाग ३

यांना देण्यात आलेत.

**दि. ०४/०९/२०१९** : रोजी गीतगायन स्पर्धा आयोजीत करण्यात आली, स्पर्धेत एकुण १० विद्यार्थी सहभागी झालेत.

परिक्षणाअंती

प्रथम क्रमांक — कु. योगेश्वरी बारसागडे — बि.एस.सी. भाग ३

द्वितीय क्रमांक — स्वरुप पुरुषोत्तम बडगे — बि.ए. भाग ३

यांना देण्यात आलेत.

**दि. ०५/०९/२०१९** : रोजी शिक्षण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. एस.एन.पठाण माजी प्राचार्य बाबुराव मडावी ज्यु. कॉलेज वडसा व अध्यक्ष म्हणून डॉ. अमीर धमानी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. टेंभुर्णे मॅडम यांनी संचालन अकीब आरीफ शेख यांनी व आभार प्रदर्शन प्रा. संदिप मेश्राम यांनी केले.

अशा प्रकारे शिक्षक दिनाने सामाजीक समरसता पंधरवाडयाची सांगता करण्यात आली.

**दि. ०५/०९/२०१९** : रासेयो प्रवेशित विद्यार्थी यादी विद्यापीठाला वाढविण्यात आली.

**दि. १३/०९/२०१९** : रोजी महाविद्यालयात आयोजीत विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेची तयारी म्हणून विद्यार्थ्यांनी मैदान तयार केलेत व कचरा साफ करुन मैदान स्वच्छ करण्यात आलेत.

**दि. १३/०९/२०१९** : रोजी शुक्रवारला नेहरु युवा केंद्रामार्फत राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय चिमूर येथे 'देशभक्ती और राष्ट्रनिर्माण के लिये युवाओ का योगदान' या विषयावर वर्क्तृत्व स्पर्धा आयोजीत करण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयातुन (तालुकास्तरीय स्पर्धा)

| | |
|---|---|
| १) अकीब आरीफ शेख | बि.एस.सी. भाग ३ |
| २) सुरज सोपान देशकर | बि.कॉम. भाग ३ |
| ३) स्वरुप पुरुषोत्तम बडगे | बि.एस.सी. भाग ३ |
| ४) राकेश हरीदास देहारे | बि.कॉम. भाग १ |

सहभागी झालेत यापैकी स्पर्धेत अकीब आरीफ शेख या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

**दि. १६, १७, १८ सप्टे. २०१९** रोजी श्री. ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव येथे विद्यापीठ स्तरीय आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतीक स्पर्धा (इंद्रधणुष्य—२०१९) आयोजीत

करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील नृत्यस्पर्धा, नकला, मुखनाट्य, सुगम संगीत, पाश्चात्त गायन, वर्क्तृत्व स्पर्धा, वादविवाद, प्रश्न मंजुषा, ललीत कला, स्पाटपेंटींग, पोस्टर स्पर्धा, कोलाज स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, फोटोग्रॉफी, कॉर्टुन पेटींग, नाटक, एकांकीका, स्पर्धेत एकुण २४ विद्यार्थी सहभागी झालेत. यापैकी

| | | |
|---|---|---|
| १) राखी धनराज कुबडे | — कोलार्ज स्पर्धा | द्वितीय बक्षीस |
| | — नाटक प्रकरण | तृतीय बक्षीस |
| | — संगीत कला | प्रथम बक्षीस |
| | — वर्क्तृत्व स्पर्धा | तृतीय बक्षीस |
| आचल सहारे | — रांगोळी स्पर्धा | तृतीय बक्षीस |
| सौरभ अलाम | — फोटोग्रॉफी | प्रथम बक्षीस |

अशाप्रकारे पारीतोषिक मिळालीत.

दि. २१/०९/२०१९

जनता महाविद्यालय चंद्रपूर येथे आयोंजीत आंतरमहाविद्यालयीन वर्क्तृत्व स्पर्धेत

१) अकीब आरीफ शेख — बि.एस.सी. भाग ३

२) प्रविण प्रभाकर पोडीशेट्टी — बि.एस.सी. भाग २

सहभागी झालेत.

**दि. २४/०९/२०१९ — रासेयो स्थापना दिन**

महाविद्यालयात दि. २४/०९/२०१९ रोजी रासेयो स्थापना दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. प्रा. हुमेश्वर आनंदे अतीथी म्हणून प्रा. संदिप मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अरुण पिसे यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. संदिप सातव यांनी केले.

कार्यक्रमात विक्की गौरकार, सुरज देशकर, निता बावणे, स्वरुप बडगे यांनी रासेयोचे माध्यमातुन विद्यार्थी विकास घडवून आणता येतो याबद्दल मार्गदर्शन केलेत.

**०२ ऑक्टो. २०१९ : गांधी जयंती**

महाविद्यालयात ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी गांधी जयंती कार्यक्रम आयोजीत करण्यात आला.

**०४ ऑक्टो. २०१९ :** महाविद्यालयातील परिसर स्वच्छता करण्यात आली.

**१० ऑक्टो. २०१९ :** दिनांक १० ऑक्टो. ते १४ ऑक्टो. २०१९ या कालावधीत महाविद्यालयात आयोजीत आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धामध्ये व्हॉलेंटिअर म्हणून मदत केली.

**११ ऑक्टो. २०१९** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतीथ्री कार्यक्रम आयोजीत करण्यात आला.

**१५ ऑक्टो. २०१९** : रोजी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. अरुण पिसे व प्रमुख अतीथी म्हणून प्रा. कु. मंगला ठाकरे उपस्थित होते. प्रा. संदिप मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. युवराज बोधे व आभार प्रदर्शन प्रा. सुमेध वावरे यांनी केलेत.

**३१ ऑक्टो. २०१९** : इंदिरा गांधी पुण्यतीथी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला.

**१४ नोव्हे. २०१९** : जवाहरलाल नेहरु यांची जयंती बालक दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. अमीर धमानी अतिथी प्रा. हुमेश्वर आनंदे, प्रा. वरदा खटी उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. संदिप मेश्राम यांनी संचालन प्रा. सुमेध वावरे यांनी केलेत.

**२६ नोव्हे. २०१९ : संविधान दिन**

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. हुमेश्वर आनंदे अतीथी म्हणून प्रा. अरुण पिसे उपस्थित होते. तसेच अतीथी म्हणून प्रा. वरदा खटी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदिप मेश्राम यांनी तर आभार प्रदर्शन सुरज देशकर यांनी केले. संचालन प्रा. बिजनकुमार शिल यांनी केलेत.

**२८ नोव्हे. २०१९ : महात्मा फुले स्मृतीदिन**

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अमीर धमानी, प्रमुख अतीथी म्हणून प्रा. महेमुद पठाण व प्रा. सुमेध वावरे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. सुमेध वावरे यांनी केलेत संचालन प्रा. बिजनकुमार शिल यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. युवराज बोधे यांनी केलेत.

**२९ नोव्हे. २०१९ :**

सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर येथे आयोजीत 'Tobaco free youth campain' कार्यशाळेत प्रा. अरुण पिसे व सुरज देशकर बि.कॉम. भाग ३ व कु. प्राची गुरुदास मोटघरे बि.एस.सी. भाग ३ उपस्थित होते. तंबाखु सेवन व त्यापासुन होणारे दुष्परीणाम यावर मार्गदर्शन मिळाले.

**०१ डिसें. २०१९ 'जागतीक एड्स दिन'**

महाविद्यालयात जागतीक एड्स दिन कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. भगत ग्रामीण रुग्णालय चिमूर, श्री मंगरुळकर जिल्हा निरीक्षक संकल्प बहुउद्देशिय संस्था चंद्रपूर, श्री, काळ सर संकल्प बहुउद्देशिय संस्था चंद्रपूर, श्री. आकलवार सर संकल्प बहुउद्देशिय संस्था चंद्रपूर, सौ. हलमारे मॅडम ग्रामीण

रुग्णालय चिमूर, श्री. साखरे ग्रामीण रुग्णालय चिमूर उपस्थित होते. कार्यक्रमानिमीत्ताने विद्यार्थ्यांना HIV व सिकलसेल टेस्ट करण्यात आल्या एकुण ५० विद्यार्थ्यांच्या टेस्ट करण्यात आल्यात.

कार्यक्रमात एड्स आजारावर जनजागरण करुन हा आजार दुर कसा ठेवता येईल यावर मार्गदर्शन करण्यात आले.

**२ डिसें. २०१९ : 'तंबाखूमुक्त शाळा अभियान'**

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. अरुण पिसे अतीथी म्हणून प्रा. युवराज बोधे डॉ. शेंडे सर ग्रामीण रुग्णालय चिमूर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. महेमुद पठाण यांनी केलेत. संचालन प्रा. बिजनकुमार शिल यांनी केलेत. कार्यक्रमात १०० विद्यार्थ्यांची मुख तपासणी करण्यात आली.

**०५ डिसें. २०१९ : पोलीस सारथी कार्यक्रम**

महीला सुरक्षेच्या दृष्टीने महाराष्ट्र पोलीस विभागाकडुन महीलासाठी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्याकरीता चिमुर पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्टेबल श्री. खामनकर उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अरुण पिसे उपस्थित होते. महिलांच्या सुरक्षेकरीता पोलीस विभाग आपल्या पाठीशी आहे. याबद्दल मार्गदर्शन व जनजागृती घडविण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. मेहरकुरे मॅडम यांनी केले.

**०६ डिसें. २०१९ : 'महापरिनिर्वाण दिन'**

भारतीय संविधानाचे जनक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन म्हणून महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. महेमुद पठाण, अतीथी म्हणून प्रा. ढोरे, प्रा. खोब्रागडे मॅडम, प्रा. अरुण पिसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. बिजनकुमार शिल यांनी केले. तर संचालन प्रा. विवेक माणिक यांनी केलेत. उपस्थितांनी डॉ. आंबेडकरांचे जिवनचरित्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

**दि. ०२ ते ०६ डिसें. २०१९ : 'इंद्रधणुष्य २०१९ मध्ये सहभागी'**

०२ ते ०६ डिसे. २०१९ रोजी गोंडवाना विद्यापीठ येथे आयोजीत 'इंद्रधणुष्य २०१९' मध्ये

१) सुभाष मंगल नन्नावरे बि.ए. भाग २
२) विक्की दिलीप गौरकार बि.कॉम. भाग ३
३) प्रविण प्रभाकर पोडीशेट्टी बि.एस.सी. भाग २
४) कु. प्रतिक्षा लिलाधर कामडी बि.एस.सी. भाग २ सहभागी झालेत.

**दि. ०३ जाने. २०२० : 'सावित्रीबाई फुले जयंती'**

महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून प्रा. संदिप मेश्राम व प्रमुख अतीथी म्हणून मा. संतोषी डोनीवाल Yes center बल्लारपुर , मा. मुग्धा काणे Yes center प्रा. निलेश ठवकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. स्नहा गनविर बि.एस. सी. भाग १ हिने केले. तर आभारप्रदर्शन प्रा. सुमेध वावरे यांनी केलेत.

**दि. १३ जाने. २०२० : 'राष्ट्रीय युवा दिन'**

राष्ट्रीय युवा दिन निमीत्ताने महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती साजरा करण्यात आली कार्यक्रमाला मा, हलमारे मॅडम आणि श्री. साखरे उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना एड्स आजाराबाबत जनजागृती करण्यात आली. अध्यक्ष म्हणून प्रा. अरुण पिसे उपस्थित होते.

**दि. १४ जाने. २०२०**

दि. १४ जाने. २०२० गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे आयोजीत उत्कर्ष २०२० चाचणी स्पर्धेकरीता एकुण ११ विद्यार्थी सहभागी झालेत. पथनाट्य, कविता, भिंतीचित्र, निबंध, वक्तृत्व, छायाचित्रन अशा अनेक स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**दि. २१/०१/२०२० ते २७/०१/२०२०**

आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा येथे आयोजीत राज्यस्तरीय रासेयो शिबीरात अचल धनराज बहादुरे बि.कॉम. भाग ३ विद्यार्थी सहभागी झाला.

**दि. २६ जाने. २०२०**

महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. तोरणेपताका लावून परिसर सजविण्यात आला. प्रथमता संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. व मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी ध्वजारोहन केले. सरतेशेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**दि. २७ जाने. ते २८ जाने. २०२०**

या कालावधीत वार्षिकोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमात अनेक स्पर्धा तसेच स्पोर्टचे आयोजन करण्यात आले. तसेच सांस्कृतीक स्पर्धा सुद्धा आयोजीत करण्यात आल्यात. उद्धाटन समारंभाला प्रा. कार्तिक पाटील रा.तु.म. चिमूर तसेच डॉ. हरेश गजभिये रा.तु.म. चिमूर उपस्थित होते.

समारोपीय कार्यक्रमाला डॉ. सुरेश बाकरे प्राचार्य ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव तसेच प्रा. गजानन कोर्तलवार ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव उपस्थित होते.

**दि. २९, ३०, ३१ जाने २०२०**

रोजी कवियीत्री बहीनाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र प्रदेश विद्यापीठ जळगांव येथे आयोजीत उत्कर्ष २०२० मध्ये

१) कु. प्रतिक्षा लिलाधर कामडी बि.एस.सी. भाग २

२) अकिब आरीफ शेख बि.एस.सी. भाग ३

सहभागी झालेत.

**दि.२८ जाने. ते ०१ फेब्रु २०२०**

चे कालावधीत मुंबई विद्यापीठ अंतर्गत सौ. डॉ. चिंतामणी देशमुख वाणिज्य सौ कुसुमताई ताम्हणे कला महाविद्यालय रोहा जि. रायगड येथे राज्यस्तरीय शिबीरात सुरज सोपान देशकर बि.कॉम. भाग ३ सहभागी झाला.

**दि. ३० जाने. २०२० 'महात्मा गांधी पुण्यतिथी'**

महाविद्यालयात महात्मा गांधी पुण्यतिथी हुतात्मा दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. अरुण पिसे व प्रा. हुमेश्वर आनंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. बिजनकुमार शिल यांनी केलेत आभारप्रदर्शन डॉ. संदिप सातव यांनी केलेत.

**दि. ०२ फेब्रु. ते ०८ फेब्रु २०२०**

मौजा भागडी ता. लाखांदुर जि. भंडारा येथे आयोजीत राज्यस्तरीय रासेयो शिबीर 'एक भारत श्रेष्ट भारत' आयोजीत केले गेले. सुरज सोपान देशकर बि.कॉम. भाग ३ विद्यार्थी सहभागी झाला होता.

वरीलप्रमाणे महाविद्यालयात अनेक प्रकारे कार्यक्रम आयोजीत करण्यात आले व विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धामध्ये संधी देवून विद्यार्थ्यामधील सुक्ष्म कलागुणांचा विकास रासेयोचे माध्यमातुन करण्यात आला.

## ० विषेश शिबीर कार्यक्रम ०

ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथील रासेयो विभागामार्फत मु. मालेवाडा येथे विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले.

**"ग्रामविकासासाठी युवा जनजागृती व श्रमसंस्कार शिबीर"**

अ) शिबीर स्थळ — मु.पो. मालेवाडा ता. चिमूर

ब) कालावधी — १६ जाने. २०२० ते २१ जाने. २०२०

क) सहभागी विद्यार्थी— पुरुष : २८ स्त्री : २३ एकुण : ५१

➢ शिबीरात राबविलेले उपक्रमाबाबत माहीती

**उद्घाटन समारंभ**

दि. १७ जाने. ते २१ जाने. २०२० या कालावधीत आयोजीत मु. मालेवाडा येथील विशेष रासेयो शिबीराचा उद्घाटन सोहळा दि. १६ जाने. रोजी पार पडला. उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष प्राचार्य डॉ. अमीर धमानी, डॉ, संदिप सातव व विशेष अतिथी मा. संजयजी पुरी संवर्ग विकास अधिकारी चिमूर, सौ. पल्लवी शेंडे सरपंच मालेवाडा, मा. प्रा. हुमेश्वर आनंदे व मा. एच.एम.कामडी सर उपस्थित होते.

## ० शिबीर काळात पुर्ण करण्यात आलेले प्रकल्प ०

**१) रस्ता तयार करणे** – शेताकडे जाण्यासाठी गावकऱ्यांना अडचन जात होती. माती टाकुन रस्ता तयार करण्यात आला.

**२) परिसर स्वच्छता** – गावातील रस्त्याच्या कडेला वाढलेली झुडपे तोडण्यात आली. व सर्व गावातील रस्ते झाडून साफ करण्यात आली.

**३) नाली निर्मीती** – गावाच्या बाहेर पाणी वाहून जाण्यासाठी एकुण ५० मीटर नाली निर्मीती करण्यात आली.

**४) नाल्यातील गाळ साफ करणे** – पावसाळा नुकताच संपल्यामुळे गावातील नाल्या गाळांनी तुंबल्या होत्या. गाळ काढुन एकुण २०० मीटर नाल्या साफ करण्यात आल्या व हा गाळ ट्रक्टरमध्ये टाकुन गावाचे बाहेर नेण्यात आला.

**५) संडास निर्मीती** – गावात संडास निर्मीतीचे कामे सुरु असुन विद्यार्थ्यामार्फत ०५ संडास खड्डे खोदण्यात आले.

**६) शोषखड्डे निर्मीती** – काही ठिकाणी सांडपाणी नालीला वाहुन जात नव्हते. त्यामुळे त्या ठिकाणी शोषखड्डे तयार करण्यात आले. एकुण ०७ ठिकाणी शोषखड्डे तयार करण्यात आले.

**७) पाणवठे सफाई** – गावात पाण्यासाठी वापरात असलेल्या विहीरीचे वाणवठे स्वच्छ करण्यात आले. अशाप्रकारे ग्रामपंचायतीचे मदतीने अनेक प्रकारची गावविकासाची कामे करण्यात आलीत.

## ० विद्यार्थी विकास कार्यक्रम ०

शिबीरार्थी विद्यार्थी व गावातील विद्यार्थी यांचे बौद्धीक व शारिरीक विकासाच्या दृष्टीने अनेक कार्यक्रम राबविण्यात आले.

१) सकाळी ०५.०० वाजता उठुन बाहेर रनिंग करायला लावणे

२) पतंजली योग समिती चिमूर द्वारा विद्यार्थ्यांना व्यायाम व योगाचे धडे देण्यात आलेत.

३) सामुदायिक ध्यान — सायंकाळी ६.०० वाजता शिबीरामध्ये सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. अनेक ग्रामस्थ या प्राथनेत सहभागी झालेत.

४) सांस्कृतिक कार्यक्रम — सायंकाळी ०८.३० वाजता गावकऱ्यांचे प्रबोधन व मनोरंजन करण्याचे उद्देशाने सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नाटीका, नकला, पथनाट्य, गितगायन, द्वारा गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षसंवर्धन, ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शेतीविकास, अशा अनेक विषयावर पथनाट्यद्वारा जनजागृती घडवून आणली. प्रबोधनासोबत विद्यार्थ्यांच्या सुक्ष्म गुनांनां विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. सांस्कृतीक कार्यक्रमाद्वारा गावकऱ्यांच्या मनोरंजनाबरोबर सामाजीक प्रबोधन घडून आलेत.

## ० बौद्धीक कार्यक्रम ०

दुपारच्या सत्रात बौद्धीक कार्यक्रमाचे आयोजन अरण्यात आले. बौद्धीक कार्यक्रमासाठी अनेक विषय ठेवण्यात आले होते. व कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी अनेक अतीथी उपस्थित होते.

**दि. १८ जाने. २०२०** रोजी 'आदर्श गाव निर्मीतीसाठी' युवकांची भुमिका या विषयांबर मार्गदर्शन करण्याकरीता अध्यक्ष मा. निलकंठ बावणे, मालेवाडा, मा. ए.यु. गजभिये जि.प.शाळा मालेवाडा, मा. जी.एल.पंधरे, जि.प.शाळा मालेवाडा, व प्रा, हुमेश्वर आनंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी सुरज देशकर यांनी केलेत प्रास्ताविक बिजनकुमार शिल यांनी केले.

**दि. १९ जाने. २०२०** रोजी 'सामाजीक शांततेत महीलांची भुमिका' या विषयावर मार्गदर्शनाकरीता अध्यक्षस्थानी सौ. लताताई पिसे सभापती प.स. चिमूर, सौ पल्लवी शेंडे सरपंच मालेवाडा, कृ. प्रज्ञा राजुरवाडे बर्शि, प्रा. वरदा खटी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कु. सरताज मॅडम यांनी केलेत.

**दि. २० जाने. २०२०** रोजी 'ग्रामीण विकासात शेती नियोजनाचे महत्व' या विषयावर मार्गदर्शनासाठी अध्यक्ष म्हणून मा बंडुभाऊ घोडमारे अध्यक्ष तंटामुक्त गावसमिती मालेवाडा, अतीथी म्हणून मा. मोरेश्वरजी झाडे कृषीभुषण शेतकरी बाढोणा, मा. कपीलजी घाटे कृषी अधिकारी मालेवाडा, प्रा. विवेक माणिक सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बिजनकुमार शिल यांनी केलेत.

दि. २१ जाने. २०२० रोजी शिबीराचे समारोपीय कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य अमीर धमानी व अतीथी म्हणून सौ. पल्लवी शेंडे, श्री. कैलासजी शेंडे, उपसरपंच मालेवाडा, सौ. एस.एस. तुरारे मॅडम, मुख्यधापक मालेवाडा उपस्थित होते.

कार्यक्रमात विक्की गौरकार व अलिशा सोरदे यांनी शिबीर अनुभव कथन केलेत. तसेच शिबीर काळातील अहवाल सुरज देशकर यांनी वाचुन दाखविला.

प्रा. बिजनकुमार शिल यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाला सर्व गावकरी, विद्यार्थी व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

## 0 शिबीर काळात आयोजीत केलेली शिबीरे 0

**१) पशुचिकीत्सा शिबीर** :

१७ जाने. २०२० डॉ. देवराव जांभुळे तालुका वैद्यकीय अधिकारी चिमूर यांचे विद्यमाने डॉ. शिशुपाल मेश्राम पशुविकास अधिकारी, जांभुळघाट यांच्या उपस्थितीत पशुचिकीत्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले. लसीकरण, खच्चीकरण, अशाप्रकारे वेगवेगळया आजारावर एकुण २०० जनावरांवर उपचार करण्यात आलेत. गावकऱ्यांनी आपआपली अनावरे शिबीरात आणुन शिबीराचा लाभ घेतली.

**२) आरोग्य शिबीर**

दि. १७ जाने. २०२० डॉ. भगत ग्रामीण रुग्णालय चिमूर यांचे मार्गदर्शनात मा. हलमारे मॅडम व चमू यांनी HIV, सिकलसेल, बि.पी., शुगर तपासणी घडवून आणली गावकऱ्यांनी या शिबीराचा लाभ घेतला. एकुण २१५ रुग्णांना या शिबीराचा लाभ मिळाला.

**३) रक्तदान शिबीर**

दि. १९ जाने. २०२० रोजी मा. गौसीया खान लोकमान्य ब्लड बॅक गोंदीया यांचे विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले. एकुण १८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सायंकाळच्या सत्रात सामुदायीक प्रार्थनेच्या महत्वावर मार्गदर्शन करण्याकरीता मा. हरिचंद्रजी दोडके, मा. चरणदास पोईनकर, मा. प्रभाकरजी नरुले, मा. झिंत्रुजी वाकडे, मा. प्रभाकरजी दुणे, मर. दुर्योधनजी दडमल, मालेवाडा उपस्थित होते.

# समारोप

महाविद्यालय म्हणजे खासकरुन तरुणांचे शैक्षणिक केंद्र १२ वीची परिक्षा पास केल्यानंतर उत्साहाने विद्यार्थी महाविद्यालयाची पायरी चढत असतात. विद्यार्थ्यांमध्ये वास्तविक उर्जा निर्माण होत असेल तर याच महाविद्यालयीन जिवनात विद्यार्थ्यांच्या या सकारात्मक उर्जेला दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन केले जाते. शिस्तीचे धडे, शिबीराच्या माध्यमातून सामाजीक समस्या, व ग्रामीण जीवनाची जानीव रासेयोच्या माध्यमातून करुन दिली. जाते. राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश केलेला विद्यार्थी नक्कीच सर्वदृष्टीने अलग असतो. हया विद्यार्थ्यांच्या आचरणात, विचारात, धैर्य, यामध्ये नक्कीच बदल झालेला असतो.

आमच्या महाविद्यालयात सुद्धा रासेयो विभाग नियमीत चालविला जातो. व या रासेयोच्या माध्यमातुन वेगवेगळे संस्कार करण्यात येतात. आणि याच संस्कारांचा परिणाम आमचे विद्यार्थी अनेक स्पर्धा, शिबीरे यामध्ये सहभागी असतातच

विद्यार्थ्यामध्ये असणारे या सुप्त गुणांना बाहेर काढुन त्यांचा विकास घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य रासेयो विभागामार्फत केले जाते. आणि हाच सुसंस्कारीत तरुण उद्याच्या सुज्ञ नागरीक म्हणून तयार होत असतो.

विद्यार्थ्यांना घडवतांना नुसत पुस्तकी शिक्षण देऊन चालणार नाही. आज. त्यांच्यामध्ये भ्रष्टाचाराबाबत चिड आणि सत्याचा पाठलाग करण्याची जिद्द निर्माण करणे महत्वाचे आहे.

राष्ट्रीय सेवा योजनांसारख्या उपक्रमामधुन हया गोष्टी साध्य होवू शकतात उद्या एक सुज्ञ व कनखर नागरीक तयार होऊ शकतो.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग सांभाळतांना मला अनेकांची मदत लाभली, आमचे प्राचार्य अमीर धमानी, यांनी वेळेवेळी निधी उपलब्ध करुन दिला.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी वेळोवेळी मदत केली या सर्वाचे आभार मानतो. व राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश करुन ज्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला त्या सर्व विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याबद्दल शुभेच्छा देतो. व इथेच अहवाल संपवतो.

जय गुरुदेव

कार्यक्रम अधिकारी
कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

# GRAMGEETA MAHAVIDYALAYA CHIMUR
## NSS CAMP (MALEWADA)
## STUDENTS LIST
## YEAR 2019-20

| Sr.No. | Name of Students | Class | Category |
|---|---|---|---|
| 1 | Shubham Raghunath Zagadkar | B.Sc. II | OBC |
| 2 | Avinash Manohar Chaudhari | B.Sc. II | OBC |
| 3 | Sagar Shrikumar Nandeshwar | B.Sc. I | SC |
| 4 | Bhushan Arvind Sahare | B.Sc. II | OBC |
| 5 | Manish Mahadeo Kulsange | B.Sc. II | ST |
| 6 | Pranay Ghanshyam Khobragade | B.Sc. I | SC |
| 7 | Mangesh Sudhakar Naitam | B.A. I | ST |
| 8 | Darmadas Tulsiram Dhakate | B.Sc. II | OBC |
| 9 | Swarup Ramesh Mesham | B.Sc. II | NT |
| 10 | Saurabh Ramesh Alam | B.Sc. II | ST |
| 11 | Amit Charandas Sonune | B.A. I | OBC |
| 12 | Achal Dhanraj Bahadure | B.Com. III | SC |
| 13 | Pankaj Rajkumar Patil | B.Com. III | SC |
| 14 | Roshan Prabhakar Revatkar | B.Com. III | OBC |
| 15 | Pravin Prabhakar Podishetti | B.Sc. II | SC |
| 16 | Saurabh Rajesh Nannaware | B.A. I | ST |
| 17 | Shubham Balkrushna Nikode | B.A. I | OBC |
| 18 | Vikki Uddhav Chaudhari | B.Com. III | ST |
| 19 | Vikki Dilip Gaurkar | B.Com. III | SC |
| 20 | Amar Mahadeo Sahare | B.Com. III | OBC |
| 21 | Anand Dhanraj Gharat | B.Sc. I | ST |
| 22 | Nutan Vinod Nikhade | B.Sc. I | OBC |
| 23 | Aniket Diwakar Doijad | B.Sc. II | OBC |
| 24 | Pranay Dhanraj Tambade | B.Sc. I | NT |
| 25 | Akib Arif Sheikh | B.Sc. III | Open |
| 26 | Pranay Sudhakar Waghmare | B.Sc. III | SC |
| 27 | Ku. Nuyera Rajendra Ramteke | B.Sc. II | SC |
| 28 | Ku. Sapna Raju Meshram | B.Sc. II | SC |
| 29 | Ku. Pratiksha Liladhar Kamdi | B.Sc. II | OBC |
| 30 | Ku. Pranita Gorakhnath Powar | B.Sc. II | NT |

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

| Sr.No. | Name of Students | Class | Category |
|---|---|---|---|
| 31 | Ku. Prachi Gurudas Motghare | B.Sc. II | SC |
| 32 | Ku. Gayatri Sanjay Bawankar | B.A. I | OBC |
| 33 | Ku.Sneha Homraj Sorde | B.A. I | SC |
| 34 | Ku. Jyostna Shatrughna Nannaware | B.A. I | ST |
| 35 | Ku. Subheccha Pramod Indorkar | B.Sc. II | SC |
| 36 | Ku. Swati Sukhdev Dharane | B.Sc. I | ST |
| 37 | Ku. Sonal Janardhan Tambharbhoge | B.Sc. I | NT |
| 38 | Ku. Shiwani Sudhakar Meshram | B.Com. I | NT |
| 39 | Ku. Rohini Kawadu Khiratkar | B.Sc. I | OBC |
| 40 | Ku. Varsha Maroti Sonwane | B.Sc. I | ST |
| 41 | Ku. Sakshi Yashwant Selokar | B.Sc. II | OBC |
| 42 | Ku. Alisha Jalendra Sorde | B.Sc. II | SC |
| 43 | Ku. Sonu Gowardhan Mundhare | B.Sc. II | ST |
| 44 | Ku. Neha Namdeo Lohakare | B.Sc. I | OBC |
| 45 | Ku. Rupali Suresh Dhanorkar | B.Sc. I | OBC |
| 46 | Ku. Anjali Devidas Vaidya | B.Sc. I | OBC |
| 47 | Ku. Karina Dnyaneshwar Karmore | B.Sc. I | OBC |
| 48 | Ku. Payal Anandrao Ughade | B.Sc. III | NT |
| 49 | Ku. Yogita Dhanraj Mohinkar | B.Sc. I | NT |
| 50 | Akash Naresh Waghmare | B.A. I | SC |
| 51 | Amit Prakash Khobragade | B.Com. III | SC |

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

पुण्यनगरी SMART चंद्रपूर

# वाचन मनुष्याला मोठं बनविते : धम्मानी



**चिमूर** : वाचन माणसाला मोठं बनविते. अनेकांच्या हातून फार मोठ्या गोष्टी घडून आल्यात ते त्यांच्या वाचन प्रेमामुळेच. वाचनामुळे आपले ज्ञान, शब्दसंग्रह वाढतो व कुठेही संभाषण करताना आपल्याला शब्दांची कमी पडत नाही व समोरच्या व्यक्तीवर आपली छाप उमटते, असे प्रतिपादन प्राचार्य अमीर धम्मानी यांनी केले. ग्रामगीता महाविद्यालय-चिमूर येथे १५ ऑक्टोबर रोजी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती ग्रंथालय विभागमार्फत वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला प्रा. अरुण पिसे, प्रा. संदीप मेश्राम, प्रा. मंगला ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. युवराज बोधे यांनी करून विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याबाबत माहिती दिली. यावेळी प्रा. संदीप मेश्राम यांनी आजच्या तरुण पिढीने डॉ. कलाम यांनी भारताला महासत्ता बनविण्याचे जे स्वप्न दाखविले ते साकार करण्याचा ध्यास घेण्याचे आवाहन केले. प्रा. मंगला ठाकरे यांनी वाचनमुळेच डॉ. कलाम एवढे उंच शिखर गाठू शकले म्हणून विद्यार्थ्यांनीसुद्धा उत्तुंग भरारी घेण्यासाठी वाचनाला महत्त्व दिले पाहिजे, असे प्रतिपादन केले. प्रा. अरुण पिसे यांनी अब्दुल कलामांनी पाहिलेले उंच उडण्याचे स्वप्न विद्यार्थ्यांनीसुद्धा बघायला हवेत. कलमांचे जीवनचरित्र वाचून एकतरी गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा, असे मत व्यक्त केले. आभार प्रा. सुनील वावरे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. वराडे, प्रा. टेंभुर्णे, प्रा. शील, प्रा. ठक्कर, प्रा. आनंदे व प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

भारतरत्न अब्दुल कलाम जयंती साजरी करतांना

नागपुर • मंगलवार, 24 सितंबर 2019

18 लोकमत समाचार • अपना विदर्भ

# ग्रामगीता महाविद्यालय के छात्रों ने मारी बाजी



नुक्कड़ प्रतियोगिता अव्वल स्थान प्राप्त करने वाले विद्यार्थी

चिमुर। 23 सितंबर। लोस

गोंडवाना विश्वविद्यालय गढ़चिरोली द्वारा आयोजित अंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक प्रतियोगिता 'इंद्रधनुष 2019' में ग्रामगीता महाविद्यालय चिमूर के छात्रों ने नुक्कड़ प्रतियोगिता में विद्यापीठ में अव्वल स्थान प्राप्त किया. इतना ही नहीं अन्य छात्रों द्वारा सराहनीय परफॉर्मेंस देकर द्वितीय व तृतीय स्थान पाया है. जिससे तहसील का नाम विद्यापीठ स्तर पर रोशन हुआ है.

विदित हो कि हर वर्ष विद्यापीठ स्तर पर महाविद्यालय के छात्रों की प्रतिभाओं को निखारने के उद्देश्य से इंद्रधनुष प्रतियोगिताएं आयोजित की जाती है. इस वर्ष नवरगांव स्थित ज्ञानेश महाविद्यालय में यह स्पर्धा ली गई. जिसमें नुक्कड़, पाश्चात गायन व स्पॉट फोटोग्राफी में प्रथम, कोलाज व प्रहसन में द्वितीय तथा वक्तृत्व स्पर्धा में तृतीय पुरस्कार महाविद्यालय ने जीता. स्पर्धा में छात्रों को पारितोषिक, प्रमाणपत्र, शील्ड व पदक से नवाजा गया.

प्रतियोगिता में जितने वाले छात्रों में आकिब शेख, सुरज देशकर, मंगल नन्नावारे, प्रणिता पवार, प्राची मोटघरे का समावेश है. छात्रों के मार्गदर्शन में प्राचार्य डॉ. अमीर धमानी की अगुवाई में डॉ. संदीप सातव व प्रा. अरुण पीसे की महत्वपूर्ण भूमिका रही.

→ इंद्रधनुष २०१९ मध्ये विद्यार्थी सहभाग.

पुण्यनगरी ७ डिसेंबर २०१९

# ग्रामगीता महाविद्यालयात महामानवास अभिवादन

चिमूर : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, थोर कायदेपंडित, आधुनिक भारताचे निर्माते, शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, लेखक, प्राध्यापक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम प्राचार्य डॉ. अमीर धम्मानी यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. मेहमूद पठाण उपस्थित होते. त्यांनी डॉ. आंबेडकरांनी अखिल भारतीय समाजासाठी जे कष्ट सोसलेत त्यासाठी त्यांची कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. बाबासाहेबांमुळेच या देशात न्याय, समता मिळाली. या प्रसंगी



प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अरुण पिसे, प्रा. नागेश ढोरे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. प्रज्ञा खोब्रागडे यांनी आपल्या प्रास्ताविकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थीदशेपासून कसे घडत गेले यावर मनोगत व्यक्त केले, तर प्रा. नागेश ढोरे यांनी आपल्या मनोगतात डॉ. आंबेडकर यांनी जे महान सामाजिक कार्य भारतासाठी केलेत यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. अरुण पिसे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी परिश्रमपूर्वक घेतलेले शिक्षण व त्यांचे शैक्षणिक कार्य याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

या प्रसंगी प्रा. प्रणाली टेंभुर्णे व महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी अभिवादनपर गीत सादर केलेत. कार्यक्रमाचे संचालन प्रा. बीजनकुमार शील यांनी केले. तर आभार प्रा. युवराज बोधे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. संदीप मेश्राम, प्रा. विवेक माणिक, प्रा. रोहित चांदेकर यांनी सहकार्य केले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. नीलेश ठवकर, प्रा. मृणाल वऱ्हाडे व इतर सर्व प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.


चंद्रपूर समाचार

गुरुवार दि.२६ सप्टेंबर २०१९


## ग्रामगीता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा सुवर्ण वर्धापन दिन साजरा



चिमूर(प्रति)-

राष्ट्रीय सेवा योजनेची ५० वर्षे पूर्तीबद्दल ग्रामगीता महाविद्यालय चिमुर येथे सुवर्ण महोत्सव दिन साजरा करण्यात आला.शिक्षण हे समाजोपयोगी असावे किंबहुना ज्ञान हे समाज व देश यांच्या कामी पडावे या करीता राष्ट्रीय सेवा योजना कार्यान्वयित करण्यात आली असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी समाजसेवी राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. अमीर धमानी यानी केले. कार्यक्रमप्रसंगी रा. से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.अरुण पिसे,प्रा.हुमेश्वर आनंदे,उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी रा. से. योजनेच्या स्वयंसेवकांनी आपले अनुभव कथन केले.त्यामध्ये सुरज देशकर,विक्की गौरकर,अमर संहारे,नीता बावणे यांचा समावेश होता प्रा. आनंदे सर यांनी विद्यार्थ्यांमधील सळसळत्या रक्ताला जागृत कसे कराल याबद्दल मार्गदर्शन केले. प्रा.पिसे सर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्येय आणि महत्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. प्रा. संदीप सातव संचालन अकिब शेख यानी कले तर पाहुण्यांचे आभार दयश्री पिंपळकर ने मानले.

देशोन्नती
मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०१९

# 'रासेयो' विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांना मदतीसाठी शहरात काढली निधी संकलन रॅली



प्रतिनिधी / २५ ऑगस्ट

नेरी : ग्रामगीता महाविद्यालय चिमूर च्या सौजन्याने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन पूरग्रस्तांना मदतीचा हात म्हणून चिमूर शहरात ठिक-ठिकाणी रॅली काढण्यात आली.

या रॅलीमध्ये विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी सुद्धा सहभाग नोंदविला असून ही रॅली ग्रामगीता कॉलेज मधून सुरु झाली तर हि रॅली प्रत्येक व्यापारी मंडळाच्या दुकानात मदत मागण्यासाठी गेले.

काही वस्त्रांच्या दुकानदारांनी पूर ग्रस्तांना वस्त्र दान करण्यात आली तर काहींनी पैशाच्या स्वरूपात दान दिले. या उपक्रमाची चिमूर शहरात सुंदर उपक्रम म्हणून चर्चा रंगली असून यावेळी प्राध्यापक डॉ. संदीप सातव, पिसे, आनंदे व विद्यार्थी सूरज देशकर, विक्की गौरकार, अमर सहारे, आचल बहादूरे व आदी विद्यार्थी यावेळी या रॅली ला उपस्थित होते.

लोकमत सोमवार, दि. ९ सप्टेंबर २०१९ ३

# चिमुरात सामाजिक सद्भावना पंधरवाडा

लोकमत न्यूज नेटवर्क

चिमूर : शहरातील ग्रामगीता महाविद्यालयात सामाजिक सद्भावना पंधरवाडा साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा, गितगायण स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मॉडेलिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पंधरवाडा कार्यक्रमाची सांगता ५ सप्टेंबर रोजी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अमीर धमानी, प्रमुख अतिथी म्हणून बाबूराव मडावी ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. एस. एन. पठाण आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. एस. एन. पठाण म्हणाले, शिक्षक हा नुसता विद्यार्थ्यांना शिकविणारा नसावा तर विद्यार्थी घडविणारा असावा, शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनातून विद्यार्थी घडतो. त्याचे भविष्य उज्ज्वल होते. त्यामुळे शिक्षकांनी त्यातून विद्यार्थ्यांचे आयुष्य घडते. डॉ. धमानी म्हणाले, शाळा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना विद्यादानाचे कार्य शिक्षक प्रामाणिकपणे करतो. परंतु शिक्षण घेऊन उंच ठिकाणी उडत असणाऱ्या विद्यार्थ्यांना बघून शिक्षकांना होणारा आनंद अतुलनीय असतो. तोच त्यांचा खरा सन्मान असतो, असे मत व्यक्त केले.

यावेळी उपस्थितांनीही मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदर ठेवण्याचा सल्ला यावेळी दिला. सद्भावना पंधरवाडा कार्यक्रमकरिता डॉ. संदीप सातव, प्रा. अरुण पिसे, प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी अथक परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा. टेंभुर्डे, संचालन अकीब शेख व आभार ग्रंथालय प्रमुख प्रा. संदिप मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur




**संविधान दिना निमित्य उद्देशिका वाचन करताना महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी**




**५१ वा रा. से. यो.स्थापना दिवस कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना कार्यक्रम अधिकारी प्रा. बिजनकुमार शिल.**

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur




रा. से.यो. शिबीर मालेवाडा येथील कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. अमिर धमानी सर.




रा. से.यो. शिबीर मालेवाडा अतंर्गत पशु चिकीत्सा शिबीराचे आयोजन

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur




रा. से.यो. शिबीर मालेवाडा येथे ग्राम स्वच्छता करतांना रा. से.यो. स्वयंसेवक



महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur